दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १३५ वा मंगळवार दि.१७ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Legrand HAVELLS Finolex KOLORS USHA PHILIPS SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

## .. तर २०२४ मध्ये केंद्रात सत्ता मिळेल : मल्लिकार्जुन खर्गे

जयपूर : काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे सोमवारी राजस्थानच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी पूर्व राजस्थानमध्ये कालवा प्रकल्पासाठी जनजागृती मोहीम सुरू केली आणि तसेच एका जाहीर सभेला संबोधित केले. यावेळी ते म्हणाले की, राजस्थानमध्ये काँग्रेसने आपले सरकार वाचवले तर २०२४ मध्ये काँग्रेस केंद्रात सत्तेवर येईल, असा दावा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केला आहे. तसेच लाल डायरीवरून सध्या राजस्थानचे वातावरण चांगलेच तापत आहे. गहलोत सरकारवर यावरून भ्रस्टाचाराचे आरोप केले जात आहेत. मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधानांनी केलेल्या आरोपावरही भाष्य केले आहे.मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की,



लाल डायरीवरून पंतप्रधान अशोक गेहलोत सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप करतात. या लाल डायरीत असे लिहिले आहे की, पुढील विधानसभा निवडणुकीनंतर राजस्थानमध्ये काँग्रेस पुन्हा सरकार स्थापन करेल. 'राजस्थानमध्ये काँग्रेस आपले सरकार वाचवण्यात यशस्वी ठरली तर २०२४ मध्ये काँग्रेस केंद्रात सत्तेवर येईल,' असा दावा त्यांनी केला आहे. तसेच ते म्हणाले की, २०१९ मध्ये राजस्थानच्या जनतेने भाजपचे २५ खासदार निवडून दिले होते. पण तो लोकांसाठी ना निधी आणू शकले ना ही पाणी. राजस्थान विधानसभेची निवडणूक २५ नोव्हेंबरला एकाच टप्प्यात होणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

## आयकर विभागाच्या छाप्यात ९४ कोटींची रोकड जप्त

बंगळुरू : आयकर विभागाने १२ ऑक्टोबर रोजी बेंगळुरू, तेलंगणा, आंध्र प्रदेशातील काही शहरे आणि दिल्लीतील ५५ ठिकाणी हे छापे टाकले होते. या छाप्यात सुमारे ९४ कोटी रुपयांची बेहिशेबी रोकड, ८ कोटी रुपयांचे सोने आणि हिऱ्यांचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) सोमवारी सांगितले की, प्राप्तिकर विभागाने कर्नाटकातील सरकारी कंत्राटदार आणि 'रिअल इस्टेट' व्यावसायिकांवर छापे टाकून ९४ कोटी रुपयांची रोकड, ८ कोटी रुपयांचे सोने आणि हिऱ्यांचे दागिने आणि परदेशी मालमत्ता जप्त केल्या आहेत. तसेच या छाप्यादरम्यान ३० महागडी घड्याळे जप्त करण्यात आली आहेत. जप्त करण्यात आलेली एकूण संपत्ती १०२ कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचे आयकर विभागाने म्हटले आहे.सीबीडीटी म्हटले आहे की, खासगी कंपनीत काम करणाऱ्या व्यक्तीच्या घरातून ३० महागडी विदेशी घड्याळे जप्त करण्यात आली आहेत. त्याचा घड्याळाच्या व्यवसायाशी काहीही संबंध नाही. कंत्राटदार आणि त्यांच्याशी संबंधित लोकांच्या घरांवर टाकलेल्या छाप्यांमध्ये त्यांच्या गुन्ह्यातील सहभागाबाबत कागदपत्रे, त्यांच्या हार्ड कॉपी, डिजिटल डेटा आदींसह बरेच पुरावे सापडले आहेत. सीबीडीटी आपल्या निवेदनात सांगितले आहे की, 'कर चुकवेगिरी' नमुन्यांवरून असे दिसून येते की, हे कंत्राटदार बनावट खरेदीचे बुकिंग करून, उप-कंत्राटदारांशी संगनमत करून, खर्चाचे खरे दावे करून आणि पात्र नसलेल्या खर्चाचा दावा करून उत्पन्न खर्च वाढवत आहेत. शाब्दिक युद्ध सुरू छाप्यात 'बेहिशोबी' रोकड सापडल्यानंतर कर्नाटकातील सत्ताधारी काँग्रेस



आणि विरोधी भारतीय जनता पक्ष (भाजप) यांच्यात या मुद्द्यावरून शाब्दिक युद्ध सुरू झाले आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष नलिन कुमार कटील म्हणाले की, छाप्यांमध्ये जप्त केलेले पैसे काँग्रेसचे आहेत, तर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आरोप फेटाळून लावले आणि हे आरोप 'निराधार' असल्याचे म्हटले आहे.

## धिरज देशमुख यांनी घेतली स्फोटातील जखमी मुलांची भेट

लातूर : फुग्यात हवा भरताना झालेल्या गॅसच्या स्फोटातील गंभीर जखमी मुलांची 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी लोकनेते विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे जावून सोमवारी भेट घेतली. मुलांच्या तब्येतीची विचारपूस करून त्यांच्या पालकांना व कुटुंबीयांना त्यांनी धीर दिला. शहरातील तावरजा कॉलनी परिसरात रविवारी सायंकाळी फुग्यात हवा भरताना गॅसचा स्फोट झाला. यात फुगे विक्रेते रामा नामदेव इंगळे (वय ५०) हे जागीच ठार झाले. तर फुगे खरेदी करण्यासाठी आलेले ४ ते १२ वर्षांचे ११ मुले गंभीर जखमी झाले. या जखमी मुलांना शहरातील लोकनेते विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले असून येथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. ही घटना समजताच 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी संबंधित मुलांवर योग्य उपचार करण्याच्या प्रशासनाला सूचना दिल्या. त्यानंतर सोमवारी रुग्णालयात



जावून सर्व जखमी मुलांची भेट घेतली. जखमी झालेल्या सर्व मुलांवर योग्य उपचार करावेत. औषधांची कमतरता भासू नये. सर्व आवश्यक आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना यावेळी त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिल्या. यासंदर्भात डॉ. शैलेंद्र चव्हाण, डॉ. सचिन जाधव, डॉ. अजय कुदळे, डॉ. प्रणिता पाटील, डॉ. स्नेहल सांगळे यांच्याशी त्यांनी चर्चाही केली. यावेळी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष ड. किरण जाधव, समद पटेल, अनुप शेळके, असिफ बागवान, अहमदखा पठाण, कैलास कांबळे, युनूस मोमीन, प्रविण सूर्यवंशी, अकबर माडजे, पिराजी साठे, शब्बीर शेख आदी उपस्थित होते.

## विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचा १७ ऑक्टोबर रोजी लातूर जिल्हा दौरा

लातूर (जिमाका) : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे ह्या मंगळवार, १७ ऑक्टोबर २०२३ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. उपसभापती श्रीमती डॉ. गोऱ्हे यांचे तुळजापूर येथून १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. सकाळी ११.३० वाजता पिडीत कुटुंबाची भेट घेतील. दुपारी १२.३० वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात लातूर व धाराशिव जिल्हाधिकारी यांच्या समवेत बैठक घेतील. दुपारी १.३० ते २.३० पर्यंत लातूर शासकीय विश्रामगृह येथे राखीव. दुपारी २.३० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेतील. तसेच दुपारी ३.३० वाजता पंढरपूरकडे प्रयाण करतील.

## गाझामध्ये आतापर्यंत २७५० लोकांचा मृत्यू

जेरुसलेम : हमासने इस्राईलवर केलेल्या हल्ल्यानंतर गेल्या दहा दिवसांपासून इस्राईल आणि पॅलेस्टिनमध्ये युद्ध सुरूच आहे. हमसच्या हल्ल्यानंतर इस्राईलने गाझा पट्टीवर मोठ्या प्रमाणावर हल्ले केले असून यात मोठी जीवित आणि वित्तहानी झाली आहे. गाझामध्ये एक हजाराहून अधिक लोक बेपत्ता असून इस्रायली बॉम्ब हल्ल्यात उद्धस्त झालेल्या घरे आणि इमारतींखाली अनेक लोक गाडले गेले आहेत.

## दिव्यांगाची सेवा म्हणजे ईश्वर सेवा : जिल्हाधिकारी गावडे

परभणी : आमदार डॉ.राहुल पाटील यांनी गरजू दिव्यांगाना वेळोवेळी शिबिरांच्या माध्यमातून मदतीचा हात दिला आहे. ही सेवा म्हणजे ईश्वर सेवा आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले.परभणी विधानसभेचे आ. डॉ.राहुल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य शिबिर योजनेंतर्गत तसेच एडीआयपी योजनेतून परभणी विधानसभा मतदार संघातील दिव्यांगांना मोफत कृत्रिम अवयव व साहित्य साधनाचे वाटप शहरातील नुतन महाविद्यालय, जिंतूर रोड येथे सोमवार, दि. १६ ऑक्टोंबर रोजी करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे बोलत होते. यावेळी आ. डॉ.राहुल पाटील, परभणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जी.प.मुख्याधिकारी रश्मी खांडेकर,समाज कल्याण अधिकारी गीता गुट्टे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती पंढरीनाथ घुले,वंचित आघाडीचे धर्मराज चव्हाण,मनपा आयुक्त तृप्ती सांडभोर,नदीम इनामदार,आदींची उपस्थिती होती.पुढे बोलताना जिल्हाधिकारी गावडे म्हणाले की, आ. डॉ. पाटील यांनी दिव्यांगासाठी सुरू केलेले उपक्रम हे अतिशय गरजेचे होते. दिव्यांगांना त्यांच्या माध्यमातून विविध अत्यावश्यक सेवा मिळत आहेत. आरोग्य तपासणी असो की आज होणारे साहित्य वाटप ही एक प्रकारे ईश्वरसेवा आहे. आ. पाटील यांनी पाथरी रोडवर सुरू केलेल्या वैद्यकीय महाविद्यालयात देखील विविध सेवा मिळत आहेत.आजपर्यंत आ.पाटील यांनी विधवा परितक्त्या महिलांना स्वावलंबी करण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली आहे तसेच आमदार आपल्या दारी कार्यक्रमाच्या माध्यमातून सामान्य जनतेच्या समस्या सोडविल्या आहेत.जेष्ठ नागरिक मंचच्या माध्यमातून जेष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवण्यात येत आहे नेहमीच राजकारण न करता समाजकारणात काम करणारे महाराष्ट्रातील एकमेव आमदार म्हणजे राहुल पाटील आहेत. येणाऱ्या काळात पुणे, मुंबईला जाण्याची गरज पडणार नाही. अशा सर्व सुविधा परभणी मेडिकल कॉलेजमध्ये उपलब्ध होतील असे देखील जिल्हाधिकारी गावडे यांनी सांगितले.



यावेळी बाजार समितीचे सभापती घुले म्हणाले की, आ. पाटील सातत्याने समाज उपयोगी उपक्रम घेत आहेत. दिव्यांगांचा विवाह सोहळा घेऊन जागतिक विक्रम केला. आता देखील दिव्यांगासाठी साहित्य वाटप करून एक प्रकारे अवयव दान केल्यासारखे वाटत असल्याचे सांगितले.यावेळी आ. डॉ. पाटील म्हणाले की, आपण जनसेवेचे वृत घेतले आहे. लोकप्रतिनिधी म्हणून जनतेची सेवा करतच राहणार. समाजोपयोगी कामे करीत असताना प्रथम प्राधान्य दिव्यांग, गरजवंत निराधार अशा नागरिकांना राहणार आहे. जे नागरीक निराधार आहेत अशांची वृध्दाश्रमात सोय करुन त्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवुन देणार आहे. दिव्यांगाची तपासणी करुन त्यातून निवडललेल्या दिव्यांगाना साहित्य देण्यासाठी शिबीर घेतले. शिबीराच्या माध्यमातून एक हजार सातशे दिव्यांगाना तिनचाकी सायकल, व्हिलचेअर, कुबडी, विविध प्रकारच्या स्टिक, अत्याधुनिक डिजीटल श्रवण यंत्र, अंध युवक व युवतींना स्मार्ट फोन व स्मार्ट केन, मतिमंद व सि.पी.बालकांना व्हिलचेअर व सी.पी चेअर, दिव्यांगामध्ये सगळ्यात जास्त आकर्षण असणारी मोटाराईज ट्राय सायकल (बॅटरी ऑपरेट) व अत्याधुनिक हायड्रोलिक जयपूर फूट व जयपूर हँड, कॅलिफर हे साहित्य दिले असल्याची माहीती आ. डॉ. पाटील यांनी दिली.याआधी माँ साहेब मिनाताई ठाकरे स्वावलबंन योजने अंतर्गत ५ हजार निराधार, विधवा महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. ही योजना शासनाने संपुर्ण राज्यात लागु करावी अशी मागणी आ.डॉ.पाटील यांनी केली.या वेळी शिवसेना,युवासेना, महिला आघाडी, दलीत आघाडी पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जेंव्हा शाळेतील विद्यार्थ्यांना येतो आमदारांचा फोन मुलांनो, पुस्तक वाचनाचा आनंद घ्या आमदार धिरज देशमुख यांनी दूरध्वनीद्वारे साधला शालेय विद्यार्थ्यांशी संवाद

लातूर : घड्याळात सायंकाळचे सहा वाजले होते. अनेक शाळेतील विद्यार्थी घरी परतले होते. पण, घनसरगाव येथील शाळेतील विद्यार्थी पुस्तक वाचनात रमले होते. हे चित्र 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांना समजले. तेव्हा त्यांनी तातडीने शाळेत दूरध्वनी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. चक्क आमदारांनी दखल घेतल्याचे पाहून विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे चेहरे आनंदाने फुलले. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून लातूर ग्रामीण मतदारसंघातील घनसरगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांशी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी दूरध्वनीद्वारे संवाद साधला.





आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, घनसरगाव येथील शाळेत अनेक चांगले उपक्रम सुरू आहेत. रात्र शाळाही उत्तम सुरु आहे. येथे सुरु असलेल्या 'रीड लातूर' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. याबाबत मला वेळोवेळी माहिती मिळते. आजही तुम्ही सायंकाळी उशिरापर्यंत पुस्तक वाचनात रमला आहात, हे मला समजले. यापुढेही 'रीड लातूर'च्या माध्यमातून तुम्हाला हवी ती पुस्तके आम्ही पुरवू. तुम्ही पुस्तक वाचनाचा आनंद घ्या. घनसरगाव येथे रात्र शाळा कशी भरते, कुठली काळजी घेतली जाते, टिव्हीची किंवा मोबाईलची आठवण होत नाही का, तुम्हाला कुठली पुस्तके आवडतात, रात्रीचे जेवण किती वाजता करता... असे विविध प्रश्न आमदार श्री. धिरज देशमुख यांनी मुलांना विचारले.

शाळेतील स्तुत्य उपक्रमाबद्दल श्री. नागनाथ रावळे, श्री. संजय देशपांडे, श्री. मनोज राठोड, श्री. बाबासाहेब इंगळे, श्री. अरूण चव्हाण, श्रीमती मंदाकिनी चेगे, श्रीमती संगिता गहेरवार, श्रीमती सिंधूताई साबदे या सर्व शिक्षकांचे व कर्मचाऱ्यांचे त्यांनी कौतुकही केले.

## मैदानी क्रीडा स्पर्धेत श्री सारंग स्वामी विद्यालयाचे घवघवीत यश

परभणी : येथील वसमत रोडवरील श्री सारंग स्वामी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर पार पडलेल्या मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादित करत विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.परभणी येथे महानगर पालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा प्रकारात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यात १७ वर्षाखालील गटात ४०० मी. रीले स्पर्धेत श्रीकांत पवार, प्रेम भरोसे, आदित्य उबाळे, नागेश शिंदे, आदर्श गाडगे या मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. मुलींमध्ये ऋतुजा नारायणकर हिने धावण्याच्या स्पर्धेत ८०० मीटर मध्ये प्रथम, तसेच १५०० मीटर मध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. त्याचबरोबर गोळाफेक या खेळ प्रकारामध्ये अफ्रिन कादर शेख ह्या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकावला आहे. ही सर्व खेळाडु विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.



सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अशोकराव सावरगावकर, सरचिटणीस धन्यकुमार शिवणकर, मुख्याध्यापक एल. ए. क्षिरसागर यांच्यासह एस. बी. पत्रिके, एस. एस. पेडगावकर, एन. एस. वांगकर, एस. टी. कीर्तनकार, एस. बी. देशमुख, बी. एस. भिसे, एस. के. गिराम, एम. एस. नरवाडे, सी. एस. यादव, एस. डी. पेंडलवार, एस. एन चव्हाण, एन. व्ही. निलंगे, आर. डी. लासे, एन. गौरशेटे, यु. सोनटक्के, एन. खाकरे, ए. फुलारी, के. शिंदे, एस. कल्याणे आदी शिक्षवृंद यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# ओंजळीतल्या सांजसावल्या..

आजूबाजूला समंजस माणसं नसती तर गैरसमज, आक्रस्ताळेपणा होऊन आजी नैराश्याच्या, बुद्धिमांद्याच्या गर्तेत बुडाल्या असत्या. माझ्यापासून लपवताय काही तरी,'' उद्वेगाने द्वारकाआजींना हुंदका फुटला. पावसाळ्य़ात द्वारकाआजींच्या जुन्या खोलीचं छत गळू लागलं म्हणून त्यांची खोली बदलली. तेव्हापासून त्या चिडचिडय़ा, संशयी झाल्या होत्या; त्यांना साध्यासाध्या गोष्टी समजतच नव्हत्या. छताची डागडुजी करून आजींना जुन्या खोलीत नेलं आणि आजी पुन्हा हसऱ्या झाल्या; त्यांची समजसुद्धा आधीच्यासारखी लख्ख झाली. आजी मुला-नातवंडा-पतवंडांत, भरल्या घरात राहत होत्या म्हणून ते सारं वेळच्या वेळी झालं. आजूबाजूला समंजस माणसं नसती तर गैरसमज, आक्रस्ताळेपणा होऊन आजी नैराश्याच्या, बुद्धिमांद्याच्या गर्तेत बुडाल्या असत्या. पण अलीकडे बरेचसे आई-वडील कुटुंबापासून, मुलांपासून दूरच राहतात. पंचाहत्तरीचे पंडितकाका आणि मेधाताई मुंबईकर. मुलगा प्रद्योत कामानिमित्त दिल्लीत. एकुलत्या एक असलेल्या मेधाताईंचे शंभरीचे वडील नागेशराव पुण्यात. जागा बदलली की ते सैरभैर होतील म्हणून त्यांना पुण्यातच ठेवायचं ठरलं होतं. काका-ताई आपला घरखर्च, बँकेची, टॅक्सची कामं स्वत:च करत. कित्येकदा मुलाचीही गुंतवणुकीची कामं ते करत. गरज लागली तर नातवंडांना सांभाळायला दिल्लीत पो-होचत. नागेश-आजोबांची देखभाल आणि बँकेची-टॅक्सची, गुंतवणुकीची-जमीनजुमल्याची कामं करायचं भाग्यही काका-ताईंनाच लाभलं होतं. 'सॅन्डविच' पिढीच्या त्या अतिकर्तृत्ववान प्रतिनिधींना चाँदबिबीसारखा अनेक आघाडय़ांवर म्हात-ारपणाशी लढा द्यावा लागतो. त्यापायी अनेक गोष्टींचं भान बाळगावं लागतं. पंडितकाकांचा प्रद्योत गुणी मुलगा आहे. तो सीसीटीव्हीवरून मुंबई-पुण्याच्या दोन्ही घरांवर पाळत ठेवतो. आई-बाबा थकल्याचं जाणवलं तर डॉक्टरांच्याही कानावर घालतो आणि पंधरवडय़ासाठी पानवलकरकाकूंकडून डबाही मागवतो. महिन्या-दोन महिन्यांतून त्याची दोन्ही घरांत एक फेरी असते. त्या वेळी तो कटाक्षाने तिथली काही कामं करतो.पंचाहत्तरीनंतर ५० टक्के लोकांना कमी ऐकू येतं. त्यांच्या कानांच्या दोषांवर योग्य उपचार करणं; श्रवणयंत्र वापरायला त्यांना योग्य मदत-मार्गदर्शन करणं गरजेचं असतं. ते मिळालं; ऐकू चांगलं आलं की त्यांना फोनवरून अनेक कामं करता येतात; मुलाबाळांशी संभाषण होतं; एकटेपणा टळतो; गरजेला मदत मागता येते. रस्त्यावरून चालताना मागून येणाऱ्या गाडीचा आवाज ऐकू येतो; जीव वाचतो. पंचाहत्तरीनंतरच्या सुमारे ९० टक्के लोकांत मोतीबिंदू, काचिबदू, नेत्रपटलाचे आजार वगैरेंमुळे दृष्टिदोष असतो आणि सात टक्के लोकांना बहुतांशी दिसत नाही. मग संगणक-मोबाइलवरून सहज होणारी कित्येक कामं शक्य होतात. बहुतेक दृष्टिदोषांवर वैद्यकीय इलाज आहेत. ते वेळीच झाले तरच व्यवहार सुरळीत चालू राहतात. बुद्धीला धार काढायचं काम ज्ञानेंद्रियं करतात. उतारवयात त्यांची साथसोबत सुटली तर नैराश्य घेरतं; बुद्धिमांद्यही येतं. वैद्यकीय मदतीने बहिरेपणावर, दृष्टिदोषांवर मात केली की बँकेची कामं आणि वाणसामानाचे हिशेबही अधिक चांगले जमतात, असं सर्वेक्षणांत दिसलं आहे. दृष्टिदोषामुळे पडझड वाढते; पडझड टाळायला घरात लख्ख उजेड आणि चालण्याच्या मार्गात आधाराला भक्कम दांडय़ा असाव्यात. गुळगुळीत संगमरवरी जमीन; मुडपत्या कडांचे गालिचे; चक्री जिने; अंधारे, वळ-णदार पॅसेजेस; सैल चपला; पायात घोटाळणारी साडी; आडवं जाणारं मांजर वगैरे लोळवणाऱ्या गनिमांचा वेळीच बंदोबस्त करावा लागतो. शिवाय त्या वयात कधी हृदय अनियमित होतं; तर कधी रक्तातल्या पाण्याचं आणि क्षारांचं संतुलन बिघडतं; पटकन उठून उभं राहिलं की रक्तदाब कोसळतो; कधी पायांतली ताकद जाते; सांधे डुगडुगतात, आखडतात; तळपायातून कळ येते; तोल सावरणं जमत नाही.. पडझडीने फ्रॅक्चर होतं; मेंदूला मार लागतो; प्रकृतीची घसरगुंडी सुरू होते. शिवाय ती नैराश्याची, बुद्धिमांद्याची नांदीही असू शकते.एकदा मेधाताईंचं पोट बिघडलं म्हणून डॉक्टरांनी गोळय़ा दिल्या. ताईंना उलटय़ा झाल्या; डोकं ठणकलं; चेहरा लाल झाला; रक्तदाब एकदम खाली गेला; त्या घेरी येऊन पडल्या. त्या मन:शांतीसाठी अश्वगंधारिष्ट घेत होत्या. ते डॉक्टरांना माहीत नव्हतं. नव्या गोळय़ांशी अरिष्टातल्या अल्कोहोलची मारामारी झाली. म्हणून किमान महिन्यातून एकदा डॉक्टरांची भेट होणं, सगळी औषधं त्यांना दाखवणं आणि दर सहा महिन्यांतून एकदा सर्वांगीण शारीरिक तपासणी आणि रक्ताच्या महत्त्वाच्या चाचण्या करून घेणं गरजेचं असतं.योग्य व्यायाम नियमितपणे केले तर पायांची ताकद वाढते आणि पडझड घटते. मदतीशिवाय चालू न शकणाऱ्या आजोबांचं जिणं सुकर करायला प्रद्योतने काही खास गोष्टी केल्या. झोपेत उठून होणारी पडझड टाळायला वर-खाली होणाऱ्या रेलिंग्जवाला पलंग घेतला. त्याला लागूनच, उंची कमी-जास्त होणारं टेबल ठेवलं. त्याची घडीची फळी उघडून पलंगावर येई; तिच्यावर जेवणखाण ठेवता येई. टेबलावर, आजोबांच्या हाताशी येतील अशी मोठय़ा, ठळक अक्षरांची पोथ्या-पुस्तकं, अक्षरं अजून मोठी करणारी बहिर्गोल भिंगं आणि बोलकी पुस्तकंही प्रद्योतने ठेवली. पोटापाण्याची, मनोरंजनाची बसल्याजागी सोय झाली.गरजेच्या इतर छोटय़ा वस्तूंनाही टेबलाच्या खणांत ठरलेल्या जागी अढळपद दिलं. जमिनीवरून न उचलता मागेपुढे होणारा, न घसरणारा वॉकरही जवळ ठेवला. उंच बैठकवाल्या शौचखुर्चीची खोलीतच सोय केली. खोलीत मोठय़ा, ठळक आकडय़ांचं, टोल्यांचं घडय़ाळ टांगलं. आजोबांचा गोंधळ कमी झाला. मेधाताईंची पुण्याला फेरी झाली की त्या अनेक खणांच्या डब्यांत (ऑर्गनायझर) आजोबांच्या महिन्याच्या गोळय़ा भरून ठेवत. आजोबांचं वजन, डायपर-रॅश, बद्धकोष्ठ यांची खुशाली घेत; नखं कापत; पाय स्वच्छ करत. शंभरीला त्वचेची डागडुजी तत्परतेने होत नाही. म्हणून मेधाताई आजोबांच्या पाठ- कंबर- टाचांवर लाल-काळे डाग, जखमा नाहीत ना ते बघत. त्वचेचा कोरडेपणा घालवण्यासाठी मॉइश्चरायझर नियमितपणे लावायचं कामाच्या माणसांना मुद्दाम सांगत. त्या वयात इन्फेक्शनने ताप येत नाही, पण वागणं सैरभैर होतं. ताई मुद्दाम आजोबांना वेगवेगळे प्रश्न विचारून बुद्धीची चाचणी घेत. आजोबा जाईपर्यंत बुद्धीने तल्लख राहिले.नागेशआजोबांच्या घरचं वाणसामान, औषधं, घराची बिलं, नोकरांचे पगार वगैरे मेधाताई मोबाइलवरूनच सांभाळत होत्या. कामाची विश्वासू माणसं खात्रीने वेळच्या वेळी पाठवणारी एक उत्तम संस्था त्यांनी गाठली होती.

# प्रादेशिक नेतृत्व - प्रोत्साहन की खच्चीकरण?

इंदिरा गांधींच्या काळात स्थानिक नेतृत्वाचे पंख कापले जात असत. आता भाजपही हाच कित्ता गिरवू लागला आहे.. महेश सरलष्कर इंदिरा गांधींच्या काळात स्थानिक नेतृत्वाचे पंख कापले जात असत. आता भाजपही हाच कित्ता गिरवू लागला आहे.. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीसाठी भाजप आणि काँग्रेसचे उमेदवार निश्चित झालेले आहेत. भाजपने तर निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याआधीच छत्तीसगड आणि मध्य प्रदेशमधील उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. जिंकण्याची क्षमता हा उमेदवार निवडीचा पहिला निकष असतो, त्या आधारावर दोन्ही पक्षांनी उमेदवार रिंगणात उतरवलेले आहेत. हाच निकष स्थानिक नेतृत्वासाठीही लागू होतो. भाजपने मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांतील स्थानिक नेतृत्वावर फारसा विश्वास ठेवलेला नाही असे दिसते. त्या तुलनेत काँग्रेसने मात्र या राज्यांतील स्थानिक नेतृत्वाकडे विधानसभा निवडणुकीची सूत्रे बिनदिक्कतपणे सोपवलेली आहेत. या निवडणुकांमध्ये या दोन्ही राष्ट्रीय पक्षांचा राज्यांतील नेतृत्वाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असल्याचे प्रकर्षांने जाणवते.मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, मिझोरम आणि तेलंगणा या पाच राज्यांपैकी फक्त मध्य प्रदेशात भाजपची सत्ता आहे. इथे चार वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या शिवराजसिंह चौहान यांनी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचा विश्वास गमावला असल्याचे दिसते. त्यांना कशीबशी तिसऱ्या यादीत उमेदवारी मिळाली. त्यांच्याकडे निवडणुकीची सूत्रे देण्यात आलेली नाहीत. उलट, शिवराजसिंह चौहान आता निरोपाची भाषा करत आहेत. 'तुम्हाला माझी आठवण येईल'.. 'मी निवडणूक लढावी का?', अशी विचारणा ते मतदारांकडे करत आहेत. असे प्रश्न विचारण्यामागे केंद्रीय नेतृत्वाला दिलेला इशारा असू शकतो.



शिवराजसिंह मध्य प्रदेश जिंकून देऊ शकत नाहीत असे भाजपच्या नेतृत्वाला वाटत असले तरी इथे त्यांना तगडा पर्यायही मिळालेला नाही. केंद्रीय मंत्री नरेंद्र तोमर वा अन्य कोणी मध्य प्रदेशचे नेतृत्व करू शकत नाही. दिल्लीच्या वेशीवर कृषी कायद्याविरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू होते, तेव्हा तोमर किती निष्प्रभ होते ते दिसलेच! मध्य प्रदेश जिंकले तर कदाचित ज्योतिरादित्य शिंदेंकडे बघितले जाऊ शकेल. भाजप निवडणूक बिनचेहऱ्यानेच लढवत आहे. त्यांच्यासाठी कुठल्याही निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी हाच एकमेव चेहरा असतो हा भाग वेगळा! त्या उलट, मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसने निवडणुकीची सर्व सूत्रे कमलनाथ यांच्याकडे दिलेली आहेत. ज्योतिरादित्य शिंदेंमुळे काँग्रेसची सत्ता गेली तरी पाच वर्षे कमलनाथ मध्य प्रदेशात ठाण मांडून आहेत. गेल्या वेळी कमलनाथ, दिग्विजय सिंह आणि ज्योतिरादित्य शिंदे अशी अंतर्गत रस्सीखेच सुरू होती. यावेळी कमलनाथ यांच्याकडे एकहाती पक्षाची सत्ता देण्यात आली आहे. इथे रणजीत सुरजेवाला यांना निवडणूक प्रभारी नियुक्त केले आहे. कर्नाटकमध्ये सुरजेवाला यांनी सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांच्यामध्ये संतुलन आणि समन्वय राखण्याची तारेवरची कसरत यशस्वी केली होती. त्यांच्याबद्दल वेगळय़ाच तक्रारी असल्या तरी पक्षनेतृत्वाने सुरजेवालांवर विश्वास ठेवला आहे. राजस्थानमध्ये भाजपचे सर्वात समर्थ आणि सक्षम नेतृत्व वसुंधरा राजेच आहेत. भाजपच्या नेतृत्वालाही ते माहीत असले तरी राजेंसारख्या- केंद्राला आव्हान देऊ शकणाऱ्या- नेतृत्वाकडे अख्खी निवडणूक सोपवण्याची मोदी-शहांची तयारी नाही. हे दोन्ही नेते राजेंचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व खपवून घेत नाहीत. अपवाद फक्त उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ. त्यांचे व्यक्तिमत्त्वही स्वतंत्र असून त्यांच्याकडेही मोदी-शहांना आव्हान देण्याची क्षमता आहे. पण, सध्या तरी उत्तर प्रदेशमध्ये नेतृत्व बदलाचे धाडस कोणी करू शकत नाही. कर्नाटकप्रमाणे राजस्थानमध्येही पक्ष नवे नेतृत्व पुढे आणत असल्याचा युक्तिवाद केला जात असला तरी, वसुंधरा राजेंचे नेतृत्व नको म्हणून नव्या नेतृत्वाची भाषा केली जात आहे. राजेंकडून नेतृत्व काढून घेतल्यामुळे तिथे भाजपकडे नेतृत्वाची पोकळी निर्माण झालेली आहे. केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, अर्जुनराम मेघवाल अशी वेगवेगळी नावे घेतली जात असली तरी, इथेही त्यांचा विचार निवडणूक जिंकली तरच केला जाईल. कर्नाटकप्रमाणे आता राजस्थानमध्येही भाजपकडे सक्षम प्रादेशिक नेतृत्व उरलेले नाही.राजस्थानमध्ये काँग्रेसची स्थिती नेमकी उलटी दिसते. काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या मध्यस्थीमुळे मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि सचिन पायलट यांच्यातील भांडण निदान आत्ता तरी मिटलेले आहे. सध्या गेहलोत सरकारच्या योजनांची चर्चा होत असून ते कधी नव्हे इतके लोकप्रिय ठरू लागले आहेत. काँग्रेसने प्रदेश काँग्रेसमधील मतभेद मिटवून निवडणुकीची सूत्रे अशोक गेहलोत यांच्याकडे सोपवली आहेत. काँग्रेसने इथे सत्ता राखली तर विजयाचे श्रेय मुरब्बी गेहलोत यांनाच असेल. राजस्थानमधील लढत दोन्ही पक्षांसाठी सोपी नाही. पण, वसुंधरा राजेंना बाजूला केल्याचा रोष चव्हाटय़ावर आलेला आहे. राजेंचा गट निवडणूक निकालानंतर कोणती भूमिका घेईल हे पाहणेही महत्त्वाचे असेल.तेलंगणामध्ये भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांमध्ये प्रादेशिक नेतृत्वावरून कुरबुरी सुरू होत्या. दोन्ही पक्षांनी तिथे नेतृत्वाचा प्रश्न सोडवला. पण तेलंगणा भाजपच्या नेतृत्वबदलामुळे प्रत्यक्ष नेतृत्व खूश असेल असे नाही. भाजपचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष संजय बंटी यांच्याबद्दल पक्षश्रेष्ठींकडे खूप तक्रारी करण्यात आल्या होत्या. अखेर त्यांची उचलबांगडी झाली आणि त्यांच्या जागी केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपद देण्यात आले. मध्य प्रदेश आणि राजस्थानप्रमाणे तेलंगणाकडेही केंद्रातून भाजपने नेता निर्यात केला. दिल्लीतून हैदराबादमध्ये झालेल्या रवानगीमुळे जी. किशन रेड्डी यांच्या हाती काय लागणार हा प्रश्न आहे.

तेलंगणामध्ये प्रमुख लढाई सत्ताधारी भारत राष्ट्र समिती आणि काँग्रेस यांच्यामध्ये आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष रेवन्त रेड्डी यांच्याविरोधातही तक्रारी झाल्या होत्या. त्यांच्या हकालपट्टीची मागणी केली जात होती. पण, खरगेंनी निरीक्षक पाठवून परिस्थितीचा आढावा घेतला. तेलंगणामध्ये रेवन्त रेड्डी कमालीचे लोकप्रिय असल्याचे खरगेंच्या लक्षात आले. त्यांनी रेवन्त रेड्डी यांना केवळ अभय दिले असे नव्हे तर, तेलंगणाच्या निवडणुकीची संपूर्ण जबाबदारीही सोपवली. खरगेंनी तत्कालीन प्रभारी व राहुल गांधींचे निष्ठावान मणिकन टागोर यांचीच उचलबांगडी केली आणि तिथे माणिकराव ठाकरे यांची प्रभारीपदी नियुक्ती केली. त्यानंतर तेलंगणा काँग्रेसमधील वातावरण बदलून गेले. आता काँग्रेसने भारत राष्ट्र समितीसमोर तगडे आव्हान उभे केले असून काँग्रेसला इथे सत्ता मिळाली तर रेवन्त रेड्डी तेलंगणाचे मुख्यमंत्री होऊ शकतील. छत्तीसगडमध्येही भाजपला स्थानिक नेतृत्वाचा प्रश्न सोडवता आलेला नाही. शिवराजसिंह चौहान यांच्याप्रमाणे माजी मुख्यमंत्री रमण सिंह यांच्या नेतृत्वावरही दिल्लीतील नेत्यांचा विश्वास नसल्याचे सांगितले जात असले तरी रमण सिंह यांच्याशिवाय पर्याय उरलेला नाही. इथेही भाजपला नवे नेतृत्व निर्माण करायचे असले तरी, अजून यश मिळालेले नाही. या वेळी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून रमण सिंह यांचे नाव पक्षाने जाहीर केलेले नाही. इथेही मोदी हाच प्रमुख चेहरा असतील. उमेदवार व नेत्याकडे न बघता कमळाकडे बघून मतदान करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. छत्तीसगडमध्ये काँग्रेस मात्र मुख्यमंत्रीपदाच्या प्रबळ दावेदारांमधील वाद मिटवण्यात यशस्वी झाला आहे. पक्षाध्यक्ष खरगेंनी मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि टी. एस. सिंह देव यांच्यामध्ये मध्यस्थी केली होती. त्यानंतर बघेल यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवण्यास देव तयार झाले. त्यांनी बघेल यांना उघडपणे पाठिबा दिला. नेतृत्वातील वाद संपल्यामुळे छत्तीसगडमध्ये काँग्रेस आता बघेल यांच्या नेतृत्वाखाली एकहाती निवडणूक लढवत आहे.या वेळी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने प्रादेशिक नेतृत्वाला बळ दिले असून त्यांच्या खांद्यावर निवडणूक सोपवलेली आहे. केंद्रीय नेतृत्वाचे नियंत्रण असले तरी, सक्षम स्थानिक नेतृत्वाच्या आधारे राज्यातील सत्ता मिळवता येऊ शकते हे काँग्रेसला कर्नाटकच्या विजयानंतर समजले असावे. भाजप मात्र प्रादेशिक नेतृत्वाचे खच्चीकरण करत असल्याचे दिसते. माजी पंतप्रधान इंदिरा गांधींच्या काळात स्थानिक नेतृत्वाचे पंख कापले जात असत. आता भाजपही हाच कित्ता गिरवू लागला आहे. मध्य प्रदेश व छत्तीसगडमध्ये भाजपने इतक्या वर्षांमध्ये नवे नेतृत्व तयार केलेले नाही. राजस्थानमध्ये वसुंधरा राजेंची कोंडी केली जात आहे. त्या तुलनेत खरगेंनी काँग्रेसच्या प्रादेशिक नेतृत्वावर अधिक विश्वास ठेवल्याचे दिसते.

# ऑलिम्पिकमध्ये क्रिकेट

बेसबॉल या स्थानिक खेळाचा प्रसार ऑलिम्पिकच्या माध्यमातून व्हावा, अशी संयोजक देशाची म्हणजे अमेरिकेची विनंती मान्य झाली. अमेरिकेत लॉस एंजलिस येथे २०२८मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये क्रिकेटचा समावेश होण्याच्या निर्णयावर सोमवारी मुंबईत शिक्कामोर्तब होईल. लॉस एंजलिस संयोजन समितीने सुचवलेल्या पाचही खेळांच्या समावेशाला मान्यता देण्याचे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (आयओसी) ठरवले. क्रिकेट, बेसबॉल/सॉफ्टबॉल, स्क्वॉश, लॅक्रॉस आणि फ्लॅग फुटबॉल हे ते पाच खेळ. यांतील शेवटचे दोन आपल्याला परिचित असण्याचे फारसे कारण नाही. बेसबॉल या स्थानिक खेळाचा प्रसार ऑलिम्पिकच्या माध्यमातून व्हावा, अशी संयोजक देशाची म्हणजे अमेरिकेची विनंती मान्य झाली. स्क्वॉश हा तसा जागतिक खेळ आणि त्याच्या समावेशाविषयी अनेक वर्षे हालचाली सुरू होत्या. पण या सगळय़ा खेळांमध्ये दर्शकव्याप्तीच्या बाबतीत क्रिकेट नि:संशय मोठा आहे. आयओसीचे अध्यक्ष थॉमस बाख हे सध्या मुंबईत आहेत. त्यांनीच दिलेल्या माहितीनुसार, गतवर्षी लॉस एंजलिस संयोजन समितीत क्रिकेटविषयी चर्चा झाली होती. तेव्हा संयोजन समितीनेच क्रिकेटच्या समावेशाविषयी अनुकूलता दर्शवली. क्रिकेट हा खेळ अद्याप अमेरिकेमध्ये म्हणावा तसा विकसित झालेला नाही. परंतु दक्षिण आशियाई स्थलांतरितांनी (यात अर्थातच प्राधान्याने भारतीय) हा खेळ त्या देशात लोकप्रिय केला. यंदा प्रथमच त्या देशात आयपीएलसारखी फ्रँचायझीकेंद्री क्रिकेट लीग खेळवली गेली. शिवाय पुढील वर्षी होत असलेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेचे सहयजमानपद अमेरिकेला मिळालेले आहे. अर्थात लोकप्रियता आणि सुविधांची उपलब्धता हे क्रिकेटच्या ऑलिम्पिक समावेश प्रक्रियेतील कळीचे मुद्दे नव्हते. खरा मुद्दा वेगळाच होता. उत्तेजक चाचणी प्रक्रिया आणि नियमावलीशी संलग्नता ही आयओसीची कोणत्याही खेळाच्या ऑलिम्पिक समावेश प्रक्रियेतील पहिली अट असते. यासाठी जागतिक उत्तेजकविरोधी संस्था अर्थात वर्ल्ड अँटी डोपिंग एजन्सी (वाडा) ही कार्यरत असते. या संस्थेशी संलग्न असलेली भारतीय संस्था म्हणजे नॅशनल अँटी डोपिंग एजन्सी अर्थात 'नाडा' देशांतर्गत उत्तेजकविरोधी मोहिमेत प्रधान असते. या संस्थेच्या कक्षेअंतर्गत येण्यास भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयने अनेक वर्षे विरोध दर्शवला होता. हा विरोध 'वाडा' आणि 'नाडा'च्या अचानक चाचणी (रँडम टेस्टिंग) नियमावलीस होता. 'आमचे क्रिकेटपटू सरसकट उत्तेजक चाचणीसाठी आपल्या प्रयोगशाळांमध्ये येऊ शकणार नाहीत', ही बीसीसीआयची भूमिका. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) ज्यावेळी ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटच्या समावेशाची तयारी सुरू केली, त्यावेळी काही मंडळांनी विरोध केला, त्यात बीसीसीआय आघाडीवर होते. बीसीसीआयचा आवाजही मोठा असल्यामुळे समावेशाचे घोडे पुढे सरकत नव्हते. पण २०१९पासून बीसीसीआय उत्तेजक चाचणीविषयी नियम स्वीकारण्यास राजी झाले.या सहस्रकाच्या पहिल्या दशकात क्रिकेटच्या ऑलिम्पिक समावेशाची चर्चा सुरू झाली, त्यावेळी ऑलिम्पिक समितीने टी-२० क्रिकेटचा विशेष उल्लेख केला होता. तीन-साडेतीन तासांचे हे सामने ऑलिम्पिकच्या व्यग्र कार्यक्रमात आणि सुविधा उभारणीच्या गुंतागुंतीमध्ये सामावून घेता येतील, असे समितीचे म्हणणे होते. ऑलिम्पिकमध्ये यापूर्वी १९०० साली क्रिकेट खेळवले गेले. पण तो जवळपास विनोदी प्रकार होता, कारण ब्रिटन आणि फ्रान्स असे दोनच संघ होते. त्यात ब्रिटनच्या संघाकडून काही क्लब दर्जाचे खेळाडू खेळले, तर फ्रान्सच्या संघात तिथे स्थायिक झालेले ब्रिटिश होते! आता तशी परिस्थिती नसेल. २०२८मध्ये किमान सहा संघ खेळतील. त्यामुळे आणखी एका खेळामध्ये भारताला ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकण्याची शक्यता निर्माण होते. अर्थात अशा स्पर्धाना प्राधान्य देण्याविषयी बीसीसीआय खरोखर किती आणि तत्परता जितकी फ्रँचायझी क्रिकेटच्या बाबतीत आपल्याकडे दाखवली जाते, तशी ती इतर वेळी दिसत नाही.ऑलिम्पिक स्पर्धा सहसा जून ते ऑगस्ट या काळात होतात. त्यामुळे मार्च-एप्रिल-मे या काळात आपल्याकडे होणाऱ्या आयपीएलमध्ये व्यत्यय येण्याची चिन्हे नाहीत. मात्र आयपीएलला केंद्रस्थानी ठेवून



गंभीर आहे हे पाहणे उद्बोधक ठरेल. परवाच्या आशियाई स्पर्धेसाठीही अखेरच्या क्षणी भारताचे पुरुष आणि महिला संघ धाडण्यास बीसीसीआय राजी झाले. नंतर लगेच विश्वचषक स्पर्धा सुरू होणार असल्याचे कारण त्यावेळी दिले गेले. खरे म्हणजे भारतासारख्या ऑलिम्पिकमध्ये अजूनही पदकदरिद्री राहिलेल्या संघाला अशा बहुराष्ट्रीय स्पर्धामध्ये धाडण्याविषयी बीसीसीआय तत्पर आणि उत्साही असायला हवे. तो उत्साह हल्ली आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा कार्यक्रम आखला जातो. त्यामुळे तशी एखादी तहकुबीतली स्पर्धा ऑलिम्पिकच्या वेळी झाली, तर तिच्यासाठी ऑलिम्पिकवर पाणी सोडण्याचे 'कठोर औदार्य' बीसीसीआयने दाखवू नये इतकीच अपेक्षा. शिवाय क्रिकेटच्या खऱ्याखुऱ्या जागतिकीकरणासाठी अशा प्रकारे ऑलिम्पिक किंवा आशियाई किंवा राष्ट्रकुल स्पर्धामध्ये खेळावेच लागेल. दहा(च) देशांच्या 'विश्वचषका'तून ते साधणारे नाही!



श्री दुर्गामाता शारदीय नवरात्र महोत्सवाची पहिल्या वर्षाची पहीली पूजा वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते संपन्न सांस्कृतीक आणि पारंपरीक पध्दतीने शोभा यात्रा, विविध स्पर्धाचे आयोजन

# दयानंद विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी मिसाईल मॅन डॉ.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन ’ वाचन प्रेरणा दिन ’ म्हणून साजरा

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१५ ऑक्टोंबर २०२३ रोजी भाषा विभाग व कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन ’ वाचन प्रेरणा दिन ’ म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.उद्धव भोसले,प्रमुख पाहुणे हास्यजत्रा फेम समीर चौगुले व दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.



यាप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी,संयुक्त सचिव सुरेश जैन,कोषाध्यक्ष संजय बोरा,दीनानाथ भुतडा,बालकिशन बांगड,अंजिक्य सोनवणे,विशाल अग्रवाल,विशाल लाहोटी,कुलसचिव डॉ.सर्जेराव शिंदे,विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ.सूर्यप्रकाश जाधव,रासेयो संचालक डॉ.मल्लिकार्जुन करजगी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड,प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड,प्राचार्य डॉ.राजाराम पवार,प्राचार्य डॉ.क्रांती सातपुते,प्राचार्य डॉ.पूनम नाथानी,उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,उपप्राचार्य प्रा.अनिलकुमार माळी,उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने,पर्यवेक्षक डॉ.वैशाली पाटील,पर्यवेक्षक डॉ.संध्या कोल्हे,दिलीप नागरगोजे,डॉ.सूर्यकांत जोगदंड,डॉ. डी.एन.मोरे,डॉ.अशोक मोटे,डॉ.महेश बेंबडे,भाषा विभागातील प्रा.मेघा पंडित,डॉ.गजानन बने,डॉ. रामशेट्टी शेटकार यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,इतर प्राध्यापक,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# धर्माची शिकवण सदाचाराची असावी भिक्खू पय्यानंद थेरो दर रविवार चलो बुद्ध विहार अभियानांतर्गत वैशाली बुद्ध विहार येथे सामूहिक बुद्ध वंदना संपन्न.

लातूर :- मानवी समूहात धर्म हा अंत्यत पवित्र व श्रद्धास्थानी आहे. समाजातील सर्वांगीण क्षेत्रात धर्मसंस्थेचा प्रामुख्याने सहभाग असतो. तेव्हा धर्माने समाजात प्रभावीपणे नीतिमत्ता, माणुसकी, चांगुलपणा यांचा प्रामुख्याने प्रचार करावा याशिवाय प्रत्येक धर्माची शिकवण सदाचाराची असावी असे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद थेरो यांनी या वेळी केले. दर रविवार चलो बुद्ध विहार अभियानांतर्गत बौद्ध नगर, लातूर येथील वैशाली बुद्ध विहार येथे सामूहिक बुद्ध वंदना संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्ध व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमाचे पुष्प आणि धुपाने वंदन करण्यात आले. त्यानंतर त्रिरत्न वंदना, बावीस प्रतिज्ञा व सामूहिक संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. पुढे बोलताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, मानवाची तांत्रिक क्षेत्रात प्रगती झाली आहे. परंतु वैचारिक, सांस्कृतिक क्षेत्रात मानसिक अज्ञान समाजात दिसून येत आहे. धर्माच्या नावाने कर्मकांड, अंधश्रद्धा, तात्विक व वैचारिक गोंधळ निर्माण केला जात आहे. त्यामुळे धर्माने या विषयी सावध भूमिका घेणे गरजेचे आहे. समाजात वैचारिक, तात्विक प्रबोधन करणे हे सर्व धर्माची सामूहिक जबाबदारी आहे त्यामुळे



धर्माने समाजातील अज्ञान नष्ट करून ज्ञान प्रसारित करणे काळाची गरज आहे. समाज नीतिमन आणि सदाचारी बनवण्याकरिता प्रत्येक धर्माने काम करावे असे वास्तविक चिंतन करावे असेही ते म्हणाले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, अंबुबाई घनघावे, अनुराधा कांबळे, मीनाक्षी सुरवसे, लता चिकटे, शिला वाघमारे, उत्तम गायकवाड, जगन्नाथ सुरवसे, सूर्यभान लातूरकर, यशपाल कांबळे, सूर्यभान लातूरकर, एच. एस. गायकवाड, अशोक सातपुते, विठ्ठल जाधव, असित कांबळे, गौतम सोनावणे व परिसरातील बौध्द उपासक, उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव कांबळे यांनी केले तर आभार उदय सोनवणे यांनी मानले. यावेळी लातूर शहरातील जेष्ठ आदर्श उपासिका स्मृतीशेष गोदावरीताई अजनीकर यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सांगता सामूहिक राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीचे अनिरुद्ध बनसोडे, राहुल शाक्यमुनी, ज्योतीराम लामतुरे, डॉ. अरुण कांबळे, मिलिंद धावारे आदिनी प्रयत्न केले.

# मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे कार्यालयासाठी धरणे-आंदोलन आमदार कालिदास कोळंबकर यांचे आश्वासन

मुंबई :- अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करताना मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई या संस्थेच्या कार्यालयाला महापालिकेने नोटीस देऊन सिल केल्यामुळे संस्था गेल्या ४ वर्षांपासून बेघर झाली आहे, २०१६ पासून सर्व पक्षीय सत्ताधारी, पालिका प्रशासनातील अधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्या गाठीभेटी, पत्रव्यवहार करूनही आश्वासनापलीकडे कुणीही दाद घेत नव्हते, त्याविरोधात दाद मागण्यासाठी मुंबई-ठाण्यातील वृत्तपत्र लेखक जुने कार्यालय असलेल्या शिंदेवाडी महापालिका शाळेसमोर एकत्र आले होते, आमदार कालिदास कोळंबकर यांनी या धरणे-आंदोलनाला तातडीने भेट दिली आणि संबंधितांशी संपर्क साधून कार्यालय पुन्हा मिळवून देतो त्याचबरोबर माझ्या मतदार संघातील जनसामान्यांचे प्रश्न निस्वार्थीपणे आणि निर्भीडपणे वर्तमानपत्रातून लिहिणारी महाराष्ट्रातील ही महत्वाची वृत्तपत्र लेखक चळवळ सुरु राहण्यासाठी मी तातडीने अगोदर मुंबई मनपा आयुक्त आणि वेळ प्रसंगी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचून प्रयत्न करणार असे आश्वासन दिले. यावेळी रवींद्र मालुसरे (अध्यक्ष ), प्रशांत घाडीगावकर (प्रमुख कार्यवाह), कार्यवाह नितीन कदम, कार्याध्यक्ष रमेश सांगळे, कोषाध्यक्ष आत्माराम गायकवाड आणि संघाचे माजी अध्यक्ष विजय ना कदम, माजी अध्यक्ष मनोहर साळवी, ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक कृष्णा काजरोळकर, मनमोहन चोणकर, कृष्णा ब्रीद,प्रकाश बाडकर, सूर्यकांत भोसले, दिलीप ल सावंत, गुरुनाथ तिरपणकर, दिगंबर चव्हाण, विवेक तवटे, राजन देसाई,अब्बास अत्तार, चंदन तावडे, रामचंद्र जायसवाल, दिलीप दळवी, दादासाहेब येंधे,अर्जुन जाधव,प्रशांत भाटकर आदी वृत्तपत्र लेखक उपस्थित होते.




# विनोद विरघट सरांची वडिलांना जलरुपी आदरांजली

अकोला: तेल्हारा तालुक्यातील ग्राम भानापुर येथील विनोद विरघट सर यांनी वडीलांचा प्रथम स्मृती दिन गावातील स्मशान भुमीला सर्व सुविधा युक्त अशी पाण्याची टाकी दान देऊन जलरुपी आदरांजली वाहली.

महाराष्ट्र हा पुरोगामी विचारसरणीचे राज्य आहे याची वारंवार प्रचीती येते. फुले शाहु आंबेडकर यांच्या कार्याने व विचाराने महाराष्ट्राची ओळख जगाच्या पाठीवर निर्माण झाली आहे. समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्यावर आधारित सर्व सामान्य माणसाला सन्मानाचे, स्वाभिमानाचे व प्रगतीचे जिवन जगण्यासाठी प्रेरणा देणारे महान नायक म्हणजेच फुले शाहु आंबेडकर होत. फुले शाहु आंबेडकर यांच्या कार्य व विचाराशी प्रामाणिक राहुन आणि सामाजिक जबाबदारी स्विकारून विनोद विरघट सर यांनी अनेक सामाजिक, शैक्षणिक कामाला सहकार्य करून स्वतः ला फुले शाहु आंबेडकर यांचे वैचारीक वारस असल्याचे सिद्ध करून दिले. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वाचनालय सुरू करुन अनेकांना शिक्षणासाठी मोठा आधार दिला. विनोद विरघट यांचे वडील दिवंगत प्रल्हादराव विरघट यांच्या प्रथम स्मृतीदिना निमित्त गावातील स्मशानभूमीला सर्व प्रशस्त असा जलकुंभ दान देऊन एक क्रांती करून अंधविश्वास दुर करण्याचा प्रयत्न केला. स्मशानभूमीत वडीलांचा प्रथम स्मृती दिन, जलकुंभ उद्घाटन करून लोकांना स्मशानभूमीत च भोजनाची व्यवस्था करून स्मशानालाही आदराचे स्थान निर्माण करून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. वडीलांच्या प्रथम स्मृतीदिना निमित्ताने आयोजित जलकुंभ उद्धाघट सोहळ्याला विनोद विरघट सरांनी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना एकत्र करून एक खुप मोठा आदर्श समाजा समोर ठेवला. तसेच वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना समाज एकता अभियान अंतर्गत मानचिन्ह देऊन सन्मानित सुद्धा करण्यात आले. वडिलांचा स्मृतीदिन हा समाजातील लोकांना जागृत करून प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल अशा पद्धतीने त्यांनी साजरा करून एक नविन पायंडा पाडला.




या ऐतिहासिक सोहळ्याचे अनेक मान्यवर साक्षीदार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गावच्या सरपंच सपना धम्मपाल वाकोडे या ह्या तर कार्यक्रमाची सुरवात ही भंते शाक्यपुत्र राहुल यांच्या धम्म देसनेने झाली. जलकुंभ लोकार्पण सोहळा हा उपस्थित सर्वच मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या मध्ये मा. बळवंतराव अरखराव सर (उप विभागीय अधिकारी अकोट), प्रा. मुकुंद भारसाखळे (प्रतिष्ठान अकोला) मा. संदिपपाल महाराज (सत्यपाल महाराज यांचे शिष्य), मा. रामपाल महाराज (सत्यपाल महाराज यांचे शिष्य), मा. शेषराव टाले (मुख्याधिकारी न. प. बाळापूर), मा. सतिश प्रघणे (अध्यक्ष, समाज एकता अभियान, पुणे) सुकेशनी जमधाडे (पोलीस अधिकारी, मुंबई) मा. अण्णासाहेब बोदडे (सहा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका), मा. सेवानंद तायडे(पोलीस अधिकार, दही हंडा), मा. भास्कर तायडे( पाणी पुरवठा अधिकारी, नागपूर), मा. श्रीकृष्ण झाडोकार (निरीक्षण, जि एस टी पुणे), सचिन गावंडे (प्रबुद्ध गृप, अकोला) सुमेध घनबहादुर (समन्वय अकोला) आदी मान्यवर उपस्थित होते. या लोकार्पण सोहळ्याला विनोद विरघट सरांचे मित्र, नातेवाईक, हितचिंतक तसेच गावकरी यांचीही उपस्थिती होती. मा. संदिपपाल महाराज व मा. रामपाल महाराज यांच्या विनोदी व प्रबोधनात्मक शब्दांनी लोकांचे प्रबोधन केले. या ऐतिहासिक स्मृतीदिन व जलकुंभ लोकार्पण सोहळ्याची चर्चा महाराष्ट्र भर होत आहे.

# नवरात्रात व्रतासाठी काय खावं?

नवरात्र मध्ये विविध रंगाचे कपडे देवीसाठी आपण वापरतो त्याचप्रमाणे आहारात देखील आहारशास्त्र आणि नवरात्राचं खूप जवळचं नातं आहे. माझं डाएट ५०% नवरात्री उपाससारखाच वाटतंय मला! राजगिरा, डाळिंब नेहमीच्या आहाराचा भाग होऊन गेलाय आणि माझ्या सासूबाई खुश आहेत माझ्यावर. गीतांजली उत्साहाने सांगत होती.

मला नवरात्रीच्या रंगानुसार डाएट करायचंय करू का ? म्हणजे एक सगळं दिवस लाल रंगाचे पदार्थ, एक पूर्ण दिवस पांढर रंग असं - करायचं का आपण ? यावर मात्र मला कौतुक वाटलं आणि कुतूहल देखील वाटलं सण आणि उत्सवाचे निकष आहाराला लागू पडतात पण त्यांचा योग्य मेळ साधणं तितकाच आवश्यक आहे .नवरात्रीच्या रंगांची जोड आहारात करताना नवरात्री हे आहार नियमनाला वेगळे आयाम देऊ शकते हे लक्षात येऊ लागलं. वेगवेगळे रंग आहारात समाविष्ट करताना ते निसर्गाच्या जवळ ठेवून त्यात गीतांजलीच्या सुगरण पानाची सांगड घालायचं मी ठरवलं आणि तिच्या आहाराचे सात्विक नियोजन केलं. नवरात्र म्हणजे आनंद. नवरात्र मध्ये विविध रंगाचे कपडे देवीसाठी आपण वापरतो त्याचप्रमाणे आहारात देखील आहारशास्त्र आणि नवरात्राचं खूप जवळचं नातं आहे. पावसाळा ओसरून ऑक्टोबर हिट सुरु होते आणि हळूहळू वातावरण बदलत बदलत आपण हिवाळ्याचे स्वागत करू इच्छितो. मात्र अचानक होणाऱ्या या ऋतूबदलांमुळे विषाणूंचे प्रमाण वाढून अनेक जण आजारी पडतात. यादरम्यान सुरु होणारे शारदीय नवरात्र तृणधान्ये , फलाहार , सात्त्विक आहार यासाठी आग्रही असते. शारदीय नवरात्रीचे व्रत आणि आहार पद्धती यांनी शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढणे आणि आतड्याचे आरोग्य सुधारण्यासाठी ही उत्तम वेळ आहे .नवरात्रीच्या आहार व्रतासाठी खालील पदार्थ प्रामुख्याने वापरले जातात तृणधान्ये फळे तेलबिया दूध आणि दुग्धजन्य पदार्थ तूप सैंधव मीठ




आहारशास्त्र आणि या व्रताची गट्टी होण्याचे आणखी एक कारण म्हणजे या व्रतादरम्यान पांढऱ्या साखरेचा होणार शून्य वापर !आहारातील पदार्थच्या चावी त्याच्या मुख्य गुणधर्माने याव्यात , कोणत्याही पदार्थाचा पोत ,चव, रंग आणि त्यातील पोषणद्रव्याचा ऱ्हास होणार नाही अशाप्रकारे सेवन करणे हे या उपवासाचे वैशिष्ट्य!नवरात्रीच्या तृणधान्यांकडे लक्ष दिल्यास आपल्या लक्षात येईल की ही तृणधान्ये कर्बोदके, प्रथिने आणि स्निग्धांशानी परिपूर्ण आहेत. तृणधान्यातील सकस खनिजद्रव्यांमुळे त्याचे पचन योग्य प्रकारे व्हावे यासाठी सोबत दही , काकडी यासारख्या प्रकृती संतुलित करणाऱ्या पदार्थांचा समावेश केला जातो. शिवाय विविध रंगी फळांचे सेवन शरीराला मुबलक पोषणमूल्यांचा आणि आवश्यक शर्करेचा पुरवठा करते. त्यामुळे नेहमीच्या आहारात क्वचित फळे समाविष्ट करणाऱ्यांसाठी हे व्रत गुणकारी आहे .

ज्यांना मधुमेह , हृदयविकार किंवा रक्तदाब यांसारखे आजार आहेत त्यांनी उपास करताना आहार भान ठेवणे आवश्यक आहे. कोणताही उपवास करताना अतिरेकी उपाशी राहणे टाळावे. तसेच दिवसभर भरपूर पाणी प्यावे (मधुमेहींनी किंवा किडनीचे विकार असणाऱ्यांनी उपवास करण्यापूर्वी आहारतज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा)

या नवरात्रीमध्ये- आहारातील सकस नवरसांचा अर्थात कर्बोदके, स्निग्धांश, प्रथिने, जीवन सत्त्वे , पोषणमूल्ये , खनिजे, शरीरातील आर्द्रता (पाणी) याबरोबर मानसिक शांतता आणि उत्तम झोप यांचे संतुलन राखले जावो आणि आरोग्याचा नवा पायंडा पडो अशी आशा करूया!

# ‘जबाबदारीचा स्वीकार’ खरंच किती महत्त्वाचा असतो?

या भागात आपण ‘जबाबदारीचा स्वीकार’ हे तत्त्व समजून घेऊया. आयुष्यात प्रॉब्लेम्स असतात का? तर नुसते असत नाहीत, सगळीकडे खच्चून भरलेले असतात. लहानपणी अजिबात इच्छा नसताना अभ्यास करायला लागणं, आवड नसली तरी करिअर करायचं म्हणून जिथं जास्त पैसा आहे ते शिक्षण घेणं, घर घेणं आणि ईएमआय भरत राहणं, लग्न करणं, लग्नाचे सुरुवातीचे नाविन्याचे व मजेचे दिवस सरले की एकमेकांची अडचण होणं, नको असलेली कामं, जबाबदाऱ्या अंगावर पडणं, मुलांच्या व घरातल्या वृद्धांच्या नानाविध समस्यांना तोंड देणं हे कमी की काय म्हणून नोकरी टिकवण्यासाठी, उद्योगधंदा सांभाळण्यासाठी करायला लागणाऱ्या तडजोडी, आजारपणं, दैनंदिन प्रवासाच्या, रस्त्यातील खड्ड्यांच्या, पाण्याच्या समस्येच्या, प्रदूषणाच्या एक ना दोन असंख्य अडचणींनी आपलं आयुष्य ओथंबून भरलेलं आहे. जिथं शोधू तिथं प्रॉब्लेम दाखवता येतील असंही म्हणता येईल. त्यामुळे आयुष्यात प्रॉब्लेम असतात का, या प्रश्नाचं उत्तर ‘भरभरून असतात हो’असंच आहे, हे मान्य करायला हवं. आणि गंमत अशी आहे की, एकदा हे मान्य केलं की मग त्याची उत्तरं शोधायला सुरुवात करता येते. प्रॉब्लेम आहे हे एकदा कळलं की प्रॉब्लेम कुणाचा आहे, आपला की दुसऱ्याचा? आपला की सरकारचा? आपला की जगाचा? हे कळायला लागतं.या आधीच्या भागात आपण उपभोग विलंबन किंवा वशश्ररूळपस सीरींळषळलरींळेप म्हणजे काय ते बघितलं. या भागात आपण ‘जबाबदारीचा स्वीकार’ हे तत्त्व समजून घेऊया. एक गृहिणी होती, जी आपला मुलगा अभ्यासच कसा करत नाही, सतत खेळात कसा रमलेला असतो, कुणाचंही ऐकत नाही, क्लास लावला तर नेमानं क्लासला जात नाही, कितीही मारलं तरी निगरगट्टासारखं वागतो, हल्ली हल्ली तर मार खायलाही घाबरत नाही, निर्ढावलाय, लक्षणं काही ठीक दिसत नाहीत अशा प्रकारच्या तक्रारी करत होती. तुम्हीही आजुबाजूला पाहिलंत तर अशा अनेक माऊली वा वडील दिसतील जे आपल्या चिरंजीवांपुढे हतबल झालेले असतात. या सगळ्याच्या मुळाशी गेलं तर अनेक प्रकरणात दिसतं, की मुलाला शाळेत घातलं (ते ही आई-वडिलांच्या इच्छेप्रमाणे मराठी वा इंग्रजी माध्यम), त्याला क्लास लावले, वह्या पुस्तकं आणि अभ्यासाला जे जे लागतं ते आणून दिलं की यापुढची अभ्यासात निपुण होऊन पहिला नंबर आणण्याची जबाबदारी मुलाचीच असते असं मानून सगळे पालक मोकळे होतात. मुलाचा केवळ अभ्यासच नाही, तर त्याचं एकूण व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी तन, मन व धन तिन्ही वर्षानुवर्षे खर्च करणं ही आपलीच जबाबदारी आहे, हे अनेकदा पालकांच्या लक्षातही आलेलं नसतं. जबाबदार पालक, मुलांना केवळ सोयीसुविधा देत नाहीत, तर त्यांना क्वालिटी टाइम किंवा दर्जात्मक वेळ देतात. त्यांच्या लहान-मोठ्या प्रत्येक समस्या, स्वत:च्या समस्या असल्याचं मानतात आणि त्या सोडवण्यासाठी मुलांबरोबरच गुंतून जातात. मुलांच्या समस्या या केवळ मुलांच्या समस्या राहिल्या नाहीत, त्या मुलांबरोबरच पालकांच्या समस्या झाल्या की मुलांचीही समस्येकडे पाहण्याची दृष्टी बदलते. पालक जबाबदारी घेताना दिसत असतील, तर कळत-नकळत मुलांच्या मनावरही त्याचा परिणाम होत जातो की जबाबदारी स्वीकारणं, त्रास स्वीकारणं ही चांगली गोष्ट आहे. पालकच जर समस्येपासून पळत असतील, तर नकळत मुलांच्याही मनावर समस्येपासून पळणं बिंबतं.अशी जबाबदारी कोण घेतं, कोण टाळतं हे अनेक छोट्या छोट्या गोष्टींमधूनही दिसतं. तुम्ही लांब पल्ल्याचा प्रवास करत असाल तर लक्षात येईल की एकदा प्रवासाला




जायचं ठरल्यानंतर. उदाहरण द्यायचं झालं तर, मुंबईवरून पुण्याला जायचं ठरलं असेल तर, अनेक लोक ते ठरल्यावरही काहीच करत नाही. काही लोक लगेच, कुठल्या गाड्या आहेत, आपल्याला कधी पोहोचायचंय, ऑनलाइन तिकिट काढायचं की स्टेशनला जाऊन काढायचं असा सारासार विचार करून तिकीट आरक्षित करून मोकळे होतात. तर अनेक जण काढू की, घाई काय आहे अजून बरेच दिवस हातात आहेत, असं म्हणत चालढकल करतात. नंतर गळ्याशी येतं तेव्हा तत्काळमध्ये काढू ते ही मिळालं नाही तर चार्ट प्रिपेअर झाल्यावर, शिल्लक जागा कळतात तेव्हा काढू. ते ही नाही मिळालं मग, टीसीला पैसे दिले की तिकिट मिळतं असं करत करत शेवटी अव्वाच्यासव्वा पैसे मोजत वा धक्के खात प्रवास करतात. आणि प्रवास संपल्यावर भारतातल्या प्रचंड गर्दीला, रेल्वेच्या गैरव्यवस्थापनाला, भारतातल्या अपुऱ्या पायाभूत सुविधांच्या नावानं लाखोली वाहतात. त्यांचे अनेक मुद्दे बरोबर असतात, चुकीचे असतात अशातला भाग नाही, पण खूप वेळा मुख्य प्रॉब्लेम या गृहस्थाचाच असतो. वाहतुकीचे प्रचंड प्रॉब्लेम असतानाही हजारो लोक रिझर्व्हेशन करून त्याच अपुऱ्या पायाभूत सुविधांचा फायदा घेत सुखाने प्रवास करतात, पण काही व्यक्ती या आनंदाला मुकतात.तर, आपल्या प्रॉब्लेम्सची जबाबदारी आपली आहे, याची जाणीव होणं आणि ती एकदा झाल्यावर मग या समस्येचं निराकारण करण्याच्या मार्गाला लागणं, असं ‘जबाबदारीचा स्वीकार’ हे बघायला गेलं तर साधं-सोपं पण तरीही अनेकांना पचनी न पडलेलं तत्त्व आहे. आपण आधी उपभोग विलंबन तत्त्व बघितलं. म्हणजे नंतर मिळणाऱ्या मोठ्या सुखासाठी, आत्ता थोडा वेळ दु:ख किंवा त्रास सहन करणं. तर हे तत्त्व अंगी न बाणवलेल्या व्यक्तींचा या जबाबदारीचा स्वीकार न करण्याशी संबंध आहे.

# उपजिल्हारुग्णालय,सब स्टेशन,पोलीस स्टेशन वसाहत आदी मागणीसाठी सम्राट मित्र मंडळाचे धरणे निदर्शने आंदोलन..

अहमदपूर दि. अहमदपूर येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणी वर्धन करून नवीन उपजिल्हारूग्णालय मंजूर करावे, महावितरणचे सबस्टेशन मंजूरी आदी विविध प्रश्नावर येथील सम्राट मित्रमंडळ–लातूर अहमदपूर च्या वतीने युवकनेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली भव्य धरणे निदर्शने अंदोलन करण्यात आले. येथील सम्राट मित्रमंडळ–लातूर अहमदपूर च्या वतीने विविध प्रलंबीत प्रश्ना संबंधाने भव्य धरणे निदर्शने अंदोलन करण्यात आले. प्रमूख्याने सम्राट मित्र मंडळाच्या वतीने तहसिलदार यांना निवेदनात पूढील मागण्या करण्यात आल्या आहेत. अहमदपूर येथे उपजिल्हारूग्णालयास मंजूरी द्यावी,अहमदपूर येथे नविन महावितरणचे सबस्टेशन मंजूर करावे. अहमदपूर येथे स्वतंत्र ग्रामीण पोलीस स्टेशन/पोलीस वसाहत मंजूर करून तातडीने निधी वितरीत करावा, पोलिस उपाधीक्षक कार्यालयाच्या बांधकामास निधी मंजूर करावा,मौजे व्हट्टी येथे दिव्यांग बौध्द समाजाच्या मुलीवर अत्याचार केलेल्या नराधमास कडक शासन करा;पिडीत कूटूंबाचे तातडीने पुनर्वसन करावे, अहमदपूर येथे मंजूर असलेले सार्वजनिक शौचालय स्वच्छतागृहाचे काम तातडीने सूरू करावे,राज्यातील




मराठा/ /मुस्लीम/धनगर/लिंगायत समाजास त्यांच्या मागण्यां प्रमाणे आरक्षण द्यावे, अहमदपूर शहरासाठी प्रस्तावीत पोलीस स्टेशन/महावितरण सबस्टेशन,/उपजिल्हारूग्णालयासाठी तातडीने शासकीय, गायरान मंजूर करावे, अहमदपूर ग्रामीण रुग्णालयामध्ये तातडीने बेबी वार्मर मशीनची सोय करावी,मौजे उजना–गंगाहिप्परगा – बेंबडेवाडी–सूमठाणा या रस्त्याची दूरूस्ती करावी. अहमदपूर येथील निजामकालीन जिल्हा परिषद शाळेची दुरावस्था असून नवीन शाळा बांधकामासाठी तातडीने निधी मंजूर करावा. निराधार योजनेचे अनूदान लाभार्थ्यांना प्रत्येक महिन्याला देण्यात यावे,सबंध दलित समाजा बद्दल अश्लील अर्वाच्च भाषेत व्हिडिओ प्रसारीत करून जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या दिलीप जाधव चेरेकर यांच्या विरोधात कडक कारवाई करावी आदी मागण्यांचा समावेश आहे. सर्वांनी शेवटी तहसिलदार शिवाजी पालेपाड यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालन सुभाष साबळे यांनी केले तर आभार सचिन बानाटे यांनी मानले.या वेळेस सय्यद तबरेजभाई यांचे मनोगत झाले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गफारखान पठाण,अजय भालेराव,भिमराव कांबळे,उध्दवराव ईप्पर,शरद सोनकांबळे, शेख रहीम शेखूभाई, गणेशराव मूंडे,मोहम्मद पठाण, नौशाद सय्यद, आकाश पवार,दिनेश तीगोटे,किशन मत्तरवाड, बळी ससाणे,परवेज पठाण,अशोक थीट्टे, अनिकेत ससाणे,प्रकाश लाडगे,राजविर मतकर, अशोक गायकवाड, यशवंत डूरे,पंढरी परतवाघ,सरपंच शरद मूंडे,शिवदास शेकडे, संविधान कदम,आनंद सोनकांबळे,पुंडलिक सोनकांबळे,गिरीष गोन्टे,मूंजाजी गवळे, भगवान नामपल्ले,युवराज गायकवाड आदींनी पुढाकार घेतला.

# श्री घादगिने यांना अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक संघाचा पुरस्कार




लातूर:– दि.१०,११ ऑक्टोबर रोजी पुणे येथे अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक संघाचे अधिवेशन गणेश कला क्रीडा रंगमंच स्वारगेट पुणे येथे संपन्न झाले या कार्यक्रमात सर्व राज्यातील जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते उद्घाटन, सत्र मान्यवरांची भाषणे , मनोरंजन कार्यक्रम जेष्ठांच्या आरोग्याविषयी भाषणे, व काही ठराव व पुरस्कार वितरण व समारोप असा कार्यक्रम पार पडला पुरस्कार वितरणात लातूरचे प्रकाश घादगिने यांना या कार्यक्रमात अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक संघाचा हिंदवा सूर्य महाराणा प्रताप पुरस्कार उदयपूर राजस्थान राज्यांच्या संघाने २०२३ चा पुरस्कार डॉक्टर विनोद शहा अध्यक्ष जनसेवा फाउंडेशन विश्वासराव भदाणे अध्यक्ष अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक संघ श्री हरी शिंदे सचिव अण्णासाहेब टेकाळे उपाध्यक्ष भवर शेठ उपाध्यक्ष व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला पुरस्कार वितरणाच्या वेळी लातूर ज्येष्ठ नागरिक संघाचे सभासद खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते प्रकाश घादगिने यांना यापूर्वी अनेक मानाचे पुरस्कार मिळाले त्यात सिराक इंडिया ठाणे महाराष्ट्र समता सेवाभावी संस्थेचा समाजभूषण पुरस्कार, बहुजन विचारमंच परभणीचा मराठवाडा गौरव पुरस्कार, ऑल इंडिया शास्त्रीय सोशल फोरमचा सेवा रत्न गौरव पुरस्कार ,स्वामी रामानंद तीर्थ शिक्षण प्रसारक मंडळ यांचा मराठवाडा गौरव पुरस्कार ,मराठी वृत्तपत्र संघ मुंबई यांचा समाज रत्न पुरस्कार, युवा समूह वर्धा चा मानव भूषण पुरस्कार ,सेंटर फॉर एज्युकेशन डेव्हलपमेंट अँड रिसर्च सेंटर पुणे चा सुरभि कला रत्न पुरस्कार ,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई यांचा कला वैभव पुरस्कार ,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन लातूरचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भूषण पुरस्कार. आदी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक संघाचा हिंदवा सूर्य महाराणा प्रताप उदयपूर राजस्थान चा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रकाश घादगिने यांचे मित्रमंडळीत सर्वत्र कौतुक करण्यात आले

# चोरीस गेलेल्या कारसह ३ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत. स्थानिक गुन्हे शाखेची अवघ्या २४ तासात पुणे येथे कारवाई. मुद्देमाल व एक आरोपी अटक.

लातूर :– चोरीस गेलेल्या कारसह ३ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत. स्थानिक गुन्हे शाखेची अवघ्या २४ तासात पुणे येथे कारवाई. मुद्देमाल व एक आरोपी अटक. या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,दिनांक १३/१०/२०२३ पोलीस ठाणे एमआयडीसी येथे रोजी गुन्ह्यातील फिर्यादीने त्याच्या मालकीची फियाट कंपनीची कार मध्यरात्री कोणीतरी अज्ञात चोरट्याने लातूर ते बार्शी जाणारे रोड वरून चोरून नेली आहे वगैरे फिर्याद दिली. त्यावरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ७५८/२०२३ कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.




सदर गुन्हा उघडकीस आणणे कामी पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, याचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात गुन्ह्यातील अरोपीच्या शोधकामी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करण्यात आले.

सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करीत असताना पथकास गुप्तबातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, लातूर ते बार्शी जाणारे रोडवरुन चोरीस गेलेली कार पुणे येथील फुरसुंगी ते हडपसर जाणारे रोडवर असून एक इसम ठिकाण विकण्याचा प्रयत्न करीत आहे. अशी माहिती मिळतात सदर पथक फुरसुंगी येथे पोहोचून पाहणी केली असता गुन्ह्यात चोरीस गेलेले कार तीच असल्याचे निष्पन्न झाले. पथकाने त्या ठिकाणी सापळा लावला थोड्याच वेळात त्या कार मध्ये बसताना पथकाने एकास ताब्यात घेतले व त्याच्याकडे विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव अरविंद बालाजी डावखरे, वय २१ वर्ष, राहणार खुटवड चौक, फुरसुंगी तालुका हवेली, जिल्हा पुणे. असे असल्याचे सांगून ११/१०/२३ रोजी मध्यरात्री लातूर ते बार्शी जाणारे रोडवर पार्क केलेली कार चोरी केल्याचे सांगितले . त्यावरून आरोपी बालाजी डावखरे याला ताब्यात घेऊन त्याच्या ताब्यातील चोरीची कार जप्त करण्यात आली असून पुढील कार्यवाही करिता आरोपी व कार पोलीस ठाणे एमआयडीसी च्या ताब्यात देण्यात आलेले आहे

तपास पथकातील पोलीस अधिकारी, अंमलदार यांनी गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने मिळालेल्या माहितीचा बारकाईने अभ्यास व विश्लेषण करून गुन्हा उघडकिस आणून गुन्ह्यात चोरलेला मुद्देमाल २४ तासात हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अमलदार राहुल सोनकांबळे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, मनोज खोसे, राम गवारे , शिंदे , चालक पोलिस अमलदार कुंभार, सायबर सेल चे पोलीस अमलदार गणेश साठे, शैलेश सुडे यांनी केली आहे.

# चव, दर्जा, तत्परता आणि उत्कृष्ट सेवा यावरच हॉटेल व्यवसायाचे यश अवलंबून – आ. कराड

लातूर :– शेतकऱ्यांच्या मुलांनी उद्योग व्यवसायात आले पाहिजे हॉटेल व्यवसायात उत्कृष्ट आणि दर्जेदार जेवण मिळाले तर जेवणासाठी माणसे कुठूनही येतात, लाईन लावून जेवणाचा आनंद घेतील. चव, दर्जा, तत्परता आणि उत्कृष्ट सेवा यावरच हॉटेल व्यवसायाचे यश अवलंबून आहे असे प्रतिपादन भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केले. लातूर शहरापासून जवळच असलेल्या मौजे तांदूळवाडी येथे कळंब रोडवर प्रदीप सोट पाटील यांनी नव्याने सुरू केलेल्या हॉटेल यश अँड रेस्टॉरंट या हॉटेल व्यवसायाचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते १५ ऑक्टोबर रविवार रोजी सायंकाळी करण्यात आला. यावेळी लातूरचे माजी महापौर विक्रांत गोजमगुडे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस विक्रमकाका शिंदे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, सांगायो समितीचे अध्यक्ष वैभव सापसोड, अँड सिद्धेश्वर धायगुडे, गोपाळ पाटील, सुधाकर गवळी, विश्वास चामे, दौलत कोदरे, सचिन हाके, प्रशांत शिंदे, ईश्वर बुलबुले, मारुती शिंदे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

घरच्या माय माऊलीच्या हाताची चव हॉटेलच्या जेवणात मिळत नाही मात्र सध्या शहराबरोबरच ग्रामीण भागातील अनेकांची हॉटेलात जेवण्याची फॅशन झाली आहे. निश्चितपणे कधीतरी बाहेर जेवायला हरकत नाही असे सांगून आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, चवीतून मने जिंकली तर यश हमखास मिळते. यश हॉटेल माध्यमातून ग्राहकांना चव, दर्जा आणि उत्कृष्ट सेवा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करून निश्चितपणे सोट परिवाराने सुरू केलेला व्यवसाय प्रगती करेल अशा सदिच्छा दिल्या. यावेळी बोलताना माजी महापौर विक्रांत गोजममुंडे यांनी हॉटेल व्यवसाय सुरू करून सोट परिवाराने धाडसी पाऊल टाकले असल्याचे सांगून ग्रामीण भागातील जनतेला शहरातील सुविधा देऊन यश हॉटेल यशस्वी होईल अशा शुभेच्छा दिल्या प्रारंभी



भागवत सोट पाटील यांनी प्रास्ताविक केले.

उपस्थित सर्व मान्यवरांचे भागवत सोट, गोपाळ सोट, प्रशांत सोट, नागनाथ कोदरे, साहेबराव सोट, कुंडलिक सोट, सुभाष पवार, बाबुराव कोदरे, जगन्नाथ पवार, दत्ता सोट, ईश्वर गोमचाळे, राहुल सूळ, पंकज देशमुख, बालाजी पांचाळ, गोपाळ सोट, श्याम पवार आदींनी स्वागत केले या कार्यक्रमास तांदुळवाडीसह आजूबाजूच्या गावातील सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धोकादायक वस्तूंच्या विक्रीची / व्यवसायाची माहिती मनपा व पोलिसांना द्या

लातूर/प्रतिनिधी: फिरत्या विक्रेत्यांकडून धोकादायक वस्तू अथवा धोकादायक परिस्थितीत कुठल्याही वस्तूची विक्री / व्यवसाय होत असल्याचे आढळून येत असेल तर नागरिकांनी सतर्क रहावे.या संदर्भात महानगरपालिका व पोलीस प्रशासनास तात्काळ माहिती द्यावी, अशा सूचना मनपाकडून करण्यात आल्या आहेत.

रविवारी (दि.१५)सायंकाळी शहरातील इस्लामपुरा–तावरजा कॉलनीत फुग्यामध्ये हवा भरताना सिलेंडरचा स्फोट होऊन विक्रेत्याचा जागीच मृत्यू झाला तर ११मुले जखमी झाली.या घटनेनंतर मनपाने तात्काळ कार्यवाही करत शहरातील फिरत्या विक्रेत्यां संदर्भात कार्यवाहीच्या सूचना प्रशासनास दिल्या.


धोकादायक स्थितीत कुठल्याही वस्तूची विक्री / व्यवसाय होत असल्याचे आढळून आल्यास त्यास प्रतिबंध करावा,असे प्रशासनास सुचित केले.यासंदर्भात नागरिकांनीही दक्षता घेणे गरजेचे आहे.अशा स्थितीत कुठल्या पदार्थाची विक्री होत असेल किंवा गॅस सिलेंडर सारख्या वस्तू सोबत बाळगून धोकादायक परिस्थितीत व्यवसाय होत असेल तर नागरिकांनी सतर्कता बाळगावी.या संदर्भात महानगरपालिका अथवा पोलीस प्रशासनास तात्काळ माहिती द्यावी. यामुळे भविष्यात घडणाऱ्या दुर्घटना टाळता येऊ शकतील,असे मनपा प्रशासनाने नागरिकांना सुचित केले आहे.

# दि फेडरेशन ऑफ हॉटेल अॅण्ड रेस्टॉरंट असोसिएशन लातूरच्या अध्यक्षपदी प्रविण कस्तुरे उदगीरकर, ब्रिजवासी व मुंदडा उपाध्यक्ष तर बरुरे यांची सचिव म्हणून निवड

लातूर/प्रतिनिधीः– लातूर जिल्ह्यात हॉटेल व्यवसाय मोठ्या प्रमाणात असून अद्यापर्यंत हा व्यवसाय करणार्यांची कोणतीही संघटना नव्हती. त्यामुळे हॉटेल व्यावसायीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन हॉटेल व्यावसायकांनी एकत्रीत येऊन दि फेडरेशन ऑफ हॉटेल अॅण्ड रेस्टॉरंट असोसिएशनची स्थापना केलेली आहे. या असोसिएशनची कार्यकारणीही जाहीर करण्यात आलेली असून याच्या अध्यक्षपदी प्रविण कस्तुरे तर उपाध्यक्ष म्हणून प्रसाद उदगीरकर, संजीवकुमार मुंदडा, विक्रम ब्रिजवासी यांची व सचिवपदी संदेश बरूरे यांची निवड करण्यात आलेली आहे. या असोसिएशनचे सदस्य म्हणून जिल्ह्यातील हॉटेल व्यावसायकांनी आपली नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आलेले आहे. हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यवसाय लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात असून हा व्यवसाय करणार्यांची कोणतीही संघटना नव्हती. परिणामी या व्यावसायीकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. तसेच हॉटेल व्यवसाय व शासन आणि प्रशासन विभाग यांच्यात सुसंवाद ठेऊन







या व्यवसायासंबंधी कायद्यातील नवीन बदल आणि त्या संबंधी येणार्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीकोनातून हॉटेल व्यावसायीकांची संघटना असावी असा मानस व्यक्त करण्यात आला होता. त्या दृष्टीकोनातून जिल्ह्यातील हॉटेल व्यावसायीकांनी एकत्रीत येऊन दि फेडरेशन ऑफ हॉटेल अॅण्ड रेस्टॉरंट असोसिएशन लातूरची स्थापना केलेली आहे. या असोसिएशनची नुतन कार्यकारणीही या बैठकीत सर्वानुमते जाहीर करण्यात आलेली आहे. यामध्ये अध्यक्षपदी प्रविण कस्तुरे तर प्रसाद उदगीरकर, संजीवकुमार मुंदडा व विक्रम ब्रिजवासी यांची उपाध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड झालेली आहे. सचिव म्हणून संदेश बरुरे, सहसचिव म्हणून महेश सुडे, कोषाध्यक्षपदी सोहेल शहा तर सहकोषाध्यक्ष म्हणून विरेंद्र सावंत यांची एकमताने निवड करण्यात आलेली आहे. कार्यकारणी सदस्य म्हणून आदित्य सोनवणे, आशितोष बेंळबे, भालचंद्र थळकरी, गणेश पाटील, देवेंद्र आदेप्पा, प्रतापसिंह बिसेन, सागर अग्रवाल, सागर रविंद्र अग्रवाल, प्रविण मिटकरी, अभय धुमाळ, प्रविण सरदेसाई यांची निवड झालेली आहे. या नुतन कार्यकारणीचे जिल्ह्यातील हॉटेल व्यावसायीकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आलेले आहे.

दि फेडरेशन ऑफ हॉटेल अॅण्ड रेस्टॉरंट असोसिएशन ही केवळ हॉटेल व्यावसायीकांच्या अडचणी सोडविण्यासाठी कार्यरत राहणार नसून सामाजिक जाण ठेवत जिल्ह्यात होणार्या विविध सामाजिक व समाजहिताच्या उपक्रमांमध्येही तितक्याच तत्परतेने सहभाग नोंदवेल अशी ग्वाही देऊन नुतन अध्यक्ष प्रविण कस्तुरे यांनी या असोसिएशचे सदस्य म्हणून जिल्ह्यातील हॉटेल व्यावसायीकांनी आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन केले आहे.

# श्री गुरू गणेश ग्रंथालयात प्रेरणा दिन उत्साहात साजरा

लातूर :– श्री गुरु गणेश ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शन,उत्कृष्ट वाचक पुरस्कार वितरण व व्याख्यानाने वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा.. लातूर येथील तीनलातूर येथील तीन दशकापासून वाचकांच्या सेवेत असलेल्या गाव भागातील श्री गुरु गणेश ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिना निमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष सुप्रसिध्द वक्ते, प्रा. डॉ. राजशेखर सोलापूर यांनी विविध विषयावरील व विशेषतः डॉ ए. पी. जे.अब्दुल कलाम यांचे साहित्य असलेल्या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन केले.मुख्य कार्यक्रमात व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ.राजशेखर सोलापूरे, प्रमुख अतिथी सुप्रसिद्ध नृत्यांगना सृष्टी जगताप,संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तेजमल बोरा,संस्थाध्यक्ष पुखराज दर्डा,संस्थासचिव राजेश डुंगरवाल यांची उपस्थिती होती.मान्यवरांच्या हस्ते यावेळी डॉ अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.प्रास्ताविकात संस्थासचिव राजेश डुंगरवाल यांनी ग्रंथालयाचे कामकाज व विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. यावेळी मान्यवरांचा ग्रंथालयाच्या वतीने शाल, माळा,ग्रंथ,भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ग्रंथालयाच्या वतीने' ज्येष्ठ वाचक गणेश महापुरकर यांना 'स्व. कु.स्नेहल राजेंद्रजी डुंगरवाल उत्कृष्ट वाचक पुरस्कार ' मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.वाचनाचे महत्व




,वाचनाचा व ज्ञानाचा उपयोग या बाबत उदाहरणासह प्रा.सोलापूरे यांनी आपल्या मार्गदर्शनात विशद केले. सृष्टी जगताप,सत्कारमूर्ती गणेश महापूरकर यांची यावेळी समयोचीत भाषणे झाली.ग्रंथालयाचे सुंदर असे सुशोभीकरण करण्यात आले होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भीमराव दुनगावे ,आभार प्रदर्शन तेजमल बोरा यांनी तर अभिनंदन पत्राचे वाचन राजेश डुंगरवाल यांनी केले.कार्यक्रमास सुमतीलाल छाजेड,रेखा डुंगरवाल,नंदुबाई ओस्तवाल, सतीश बोरा ,शरद डुंगरवाल व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोन दिवसीय ग्रंथ प्रदर्शनाचा शेकडो विद्यार्थी व वाचकांनी लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रंथपाल सुनील गिरी,राम घोलप, दीप्ती कांबळे यांनी अथक परिश्रम घेतले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE